रक्तदानजीवनदान

महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव

## (अधिष्ठातायांचेकार्यालय)

Jilhapeth, Government Hospital Campus, Jalgon- 425001, M.S. (INDIA)
Telephone & Fax No. 0257- 2232390
Email- deangmcjalgaon@gmail.com

जा.क्र.शावैमज/आस्था-३/सीसीएमपी/क.लि./कंत्राटी/नियुक्ती/ 2980 /२०२२, दिनांक:- 26 /05/२०२२

प्रति,
मा.जिल्हा माहिती व जनसंपर्क अधिकारी,
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, जळगांव.

**विषय – शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव या संस्थेत कंत्राटी तत्वावर कनिष्ठ लिपिक या पदासाठी (मानधन) पध्दतीने ११ महिन्यांच्या कालावधीसाठी निव्वळ तात्पूरत्या स्वरुपात नेमणुक करणेकामी जाहिरात प्रसिध्द करणे बाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव या संस्थेतंर्गत सन २०१९ पासुन औषधशास्त्र विभागात **Certificate Course in Modern Pharmacology** हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आलेला आहे. सदर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी **Certificate Course in Modern Pharmacology** चे माहितीपत्र यात लिपिक (कंत्राटी) रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) इतके प्रति महिना मानधन मंजुर आहे. सदरहू एकत्रित मानधन हे आरोग्य विज्ञान विद्यापीठातंर्गत **Certificate Course in Modern Pharmacology** या अभ्यासक्रमासाठी मंजुर अनुदानातुन भागविण्यात येणार असून, यासाठी कनिष्ठ लिपिक या पदासाठी कंत्राटी (मानधन) पध्दतीनुसार नेमणुक करण्याकरीता जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी माहिती या सोबत जोडुन पाठविण्यात येत आहे. सबबृ स्थानिक जिल्हातंर्गत शासन मान्य वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

| | | |
|---|---|---|
| १. | जाहिरात प्रसिध्दीस देणा-या अधिका-याचा हुद्या | अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव जिल्हापेठ, जिल्हा सामान्य रुग्णालय आवार, जळगांव- ४२५ ००१. (दुरध्वनी क्रमांक ०२५७ २२३२३९०) |
| २. | जाहिरात कोणत्या तारखेपुर्वी प्रसिध्द करावयाची आहे. | दि. ०१/०६/२०२२ |
| ३. | जाहिरात प्रसिध्द कशी करावी | जिल्हा स्तरावरील किमान एक मराठी दैनिकातुन एकच वेळा |
| ४. | जाहिरात देयक कोणास पाठवावे | अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव जिल्हापेठ, जळगांव. |
| ५. | जाहिरात किती वृत्तपत्रातुन व किती वेळा प्रसिध्द करावयची आहे. | जिल्हा स्तरावरील मराठी दैनिकातुन एकदा. |

सोबत – जाहिर नोटीस तिन प्रतित.

(डॉ जयप्रकाश रामानंद)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव

टिप :- सदर जाहिरात एका पेक्षा अधिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येवु नये. तसेच जाहिरात ही दोन कॉलम ८ सें.मी. या आकारातच प्रसिध्द करण्यात यावी, जाहिरातीची देयके तीन प्रतीत शासनमान्य दराच्या शासन निर्णयासह देयका सोबत संस्थेस पाठविण्यात यावे.

प्रत:- १) मा.संचालक, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा.कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांना माहितीस्तव सविनय सादर.
३) प्राध्यापक व विभागप्रमुख, औषधशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव.

Scanned by CamScanner

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव

## कनिष्ठ लिपीक कंत्राटी पध्दतीने भरण्याची जाहीरात

या संस्थेमध्ये औषधशास्त्र विभागात **Certificate Course in Modern Pharmacology** हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आलेला आहे. सदर अभ्यासक्रमासाठी कनिष्ठ लिपीक कंत्राटी पध्दतीने-०१ पद रु.१०,०००/-(अक्षरी रुपये दहा हजार मात्र) इतके प्रति महिना एकत्रित मानधनतत्वावर निव्वळ ११ महिन्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात भरण्यासाठी ईच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत असून, सदर पदासाठीची सविस्तर जाहिरात, अर्जाचा नमुना, शैक्षणिक अर्हता व अटी व शर्ती या संस्थेच्या संकेतस्थळावर **www.gmcjalgaon.org** प्रसिध्द करण्यात येत आहे.

अर्ज सादर करण्याचा अंतिम दि.०९/०६/२०२२ सायं.०५.४५ वाजेपर्यंत. मुलाखतीचा दि.१३/०६/२०२२ सकाळी ११.०० वाजता अधिष्ठाता यांच्या दालनात.

(डॉ जयप्रकाश रामानंद)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव

Scanned by CamScanner

# सविस्तर जाहीरात

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव या संस्थेमध्ये औषधशास्त्र विभागात **Certificate Course in Modern Pharmacology** हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आलेला आहे. सदर अभ्यासक्रमासाठी कनिष्ठ लिपीक कंत्राटी पध्दतीने -०१ पद रु.१०,०००/-(अक्षरी रुपये दहा हजार मात्र) इतके प्रति महिना एकत्रित मानधन तत्वावर निव्वळ ११ महिन्यांच्या कालावधीसाठी अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्याकरीता जाहिरात देण्यात येत आहे.

| अ.क्र | पदनाम | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता | दरमहा एकत्रित ठोक मानधन |
|---|---|---|---|---|
| १. | कनिष्ठ लिपीक (कंत्राटी) | 01 | बी.ए/बीएस्सी/बी.कॉम, अशा कोणत्याही शाखेतील पदवीधर मराठी टायपींग-३० व इग्रजी ४० प्रति शब्द मिनिट एमएससीआयटी पात्रता आवश्यक | रु.१०,०००/- (एकत्रित सर्व भत्त्यासहीत) |

अटी व शर्ती:-

१) उमेदवाराचे वय हे १८ वर्षे पुर्ण असले पाहिजे. मागासवर्गीय उमेदवार यांचे वयाची मर्यादा ४३ वर्षे खुला प्रवर्गातील उमेदवार ३८ वर्षे असली पाहिजे.
२) अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नसावा.
३) वरील पदे निव्ळ कंत्राटी स्वरुपाचे असुन ती राज्य शासनाच्या कर्मचारी म्हणता येणार नाही.
४) ज्या उमेदवारांचे अर्ज विहीत दिनांक व वेळेत प्राप्त होतील त्याच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील.
५) सदर पदावर काम करण्याचा अनुभव असल्यास प्राध्यान्य देण्यात येईल.
६) उमेदवारांना मुलाखतीच्या ठिकाणी अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव यांच्या कार्यालयात स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.
७) उमेदवारास वैद्यकीय दृष्टया शारीरीक व मानसिक पात्र असल्याबाबतचे वैद्यकिय अधिक्षक अथवा जिल्हा शल्य चिकित्सक यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(कर्तव्य व जबाबदा-या)

१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव येथे **Certificate Course in Modern Pharmacology** हा अभ्यासक्रम संबंधी इतर सर्व अनुषंगीक कामे करावी लागतील.

(विशेष सुचना)

१) शैक्षणिक अर्हता व अनुभव प्राप्त करणा-या उमेदवारांना प्राध्यान्य देण्यात येईल. ((अनुभव प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे)
२) प्रशासकीय किंवा काही कारणास्तव निवड (भरती) प्रक्रिया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्प्यावर थांबवण्याचा अधिकार अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव यांनी राखुन ठेवलेले आहेत.
३) सदरहू नियुक्ती ही कंत्राटी तत्वावरील असल्यामुळे कायम स्वरुपाचा हक्क सांगता येणार नाही.
४) सदरील पदावर कंत्राटी स्वरुपात कार्यरत उमेदवारास भविष्यात सदरील जागेवर कायमस्वरुपी नेमणुकीचा कोणताही हक्क राहणार नाही, असे उमेदवारास लेखी स्वरुपात प्रतिज्ञापत्र या कार्यालयास सादर करावे लागेल.
५) नियुक्ती झाल्यानंतर सेवा सुरु झाल्यानंतर कोणत्याही क्षणी कोणत्याही सबबीशिवाय कोणत्याही उमेदवारांची सेवा समाप्त करण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता यांनी राखुन ठेवले आहेत.
६) अर्जासोबत पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हतेनुसार प्रमाणपत्रे (प्रत्येक वर्षाची गुणपत्रिका, उत्तीर्ण प्रमाणपत्र, डिग्री (अत्यावश्यक), बारावीचे प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, पासपोर्ट साईज फोटो, ओळखपत्र उदा. आधार कार्ड/ पॅन कार्ड/ ड्रायव्हींग लायसन्स/ पासपोर्ट यापैकी कोणतेही दोन जोडावेत. (उपरोक्त सर्व कागदपत्रांच्या छायाकींत प्रती अर्जासोबत साक्षांकित करुन जोडणे आवश्यक राहील.)

Scanned by CamScanner

७) विहीत मुदतीत प्राप्त होणा-या अर्ज स्वीकृती व छाननी करुन पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी या संस्थेच्या संकेतस्थळावर **www.gmcjalgaon.org** यावर व संस्थेच्या नोटीस बोर्डवर दि. १० /०६/२०२२ रोजी सायंकाळी ०५-०० वाजता प्रसिध्द करण्यात येईल व पात्र उमेदवारांना प्रत्यक्ष मुलाखती करीता सर्व मुळ प्रमाणपत्रासह दि. १३ /०६/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव या कार्यालयात स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. तसेच मुलाखती करीता अनुपस्थितीत असणा-या उमेदवारांचा अर्जावर विचार करण्यात येणार नाही.

८) मुलाखतीच्या वेळेस सर्व कागदपत्रांच्या मुळ प्रती सोबत आणणे बंधनकारक राहील. मुळ कागदपत्रे सादर न करणा-या उमेदवाराचा विचार करण्यात येणार नाही.

९) मुलाखतीचे ठिकाण :- अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव यांचे दालन.

(डॉ जयप्रकाश रामानंद)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव

Scanned by CamScanner

# -: अर्जाचा नमुना :-

पासपोर्ट
साईज फोटो

प्रति,
मा.अधिष्ठाता,
शासकिय वैद्यकीय महाविद्यालय,
जळगाव.

१) पदाचे नाव - ----------------------------------------

२) अर्जदाराचे नाव - ----------------------------------------

३) जन्म दिनांक - ----------------------------------------

४) पत्रव्यवहाराचा पत्ता - ----------------------------------------

----------------------------------------

५) कायमस्वरुपी पत्ता - ----------------------------------------

६) दुरध्वनी/भ्रमणध्वणी क्रमांक - ----------------------------------------

७) ई-मेल आय डी - ----------------------------------------

८) संगणकाचे ज्ञान - ----------------------------------------

९) शैक्षणिक अर्हता –

| अ.क्र. | शैक्षणिक आर्हता पदवीका/ पदवी | विद्यापीठ/मंडळ/संस्थेचे नाव | शेवट वर्ष टक्केवारी | शेवट वर्ष श्रेणी |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |
| ५. | | | | |

१०) अतिरिक्त शैक्षणिक अर्हता –

(मागील पानावर)

Scanned by CamScanner

११) कामाचा अनुभव-

| अ.क्र. | संस्थेचे नाव | पदनाम | कालावधी | अनुभव वर्ष/महिना |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

## -: घोषणा पत्र :-

प्रमाणित करण्यात येते की, सदर जाहिरात मी संपुर्ण पणे वाचली आहे. अर्जा सोबत जोडलेली माहिती मी स्वत: भरलेली आहे. मला पुर्णपणे जाणीव आहे की, कंत्राटी पध्दतीने लिपीक कंत्राटी या पदाकरीता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्यासाठी कालावधीकरीता नियुक्ती करण्यात येणार आहे. सदर पद योजनेच्या व्याप्ती प्रमाणे कमी/अधिक करण्यात येतील, ही नियुक्ती औषधशास्त्र विभागात **Certificate Course in Modern Pharmacology** हा अभ्यासक्रम सुरु करण्याकरिता पुर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल. यात काही चुक अथवा खोटी माहिती आढळुन अल्यास त्याची सर्वस्वी जवाबदारी माझ्यावर राहिल. आपण घोषीत केलेले सर्व अटी व शर्ती मला अवगत/मान्य आहेत. करिता या बाबत मी घोषणा पत्र देत आहे.

स्वाक्षरी

नाव

दिनांक:- / /२०२२.

ठिकाण:-

Scanned by CamScanner